# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१९/०७/१७

## दि.१८/०७/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ११९/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | प्रदिप जबडे,वय-४५,रा.सुर्यनगरी,पिंपळे-गुरव,पुणे |
| **आरोपी** | तेजस (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०६/१७ ते आजपावेतो वर्तक हेरीटेज एरंडवणे,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादीस मोबाईलवर फोन करुन,एम्स हॉस्पीटल मधुन बोलत असल्याचे सांगुन,स्वतः डॉक्टर व हॉस्पीटल मध्ये पर्चेस मॅनेजर असल्याचे सांगुन,फिर्यादी यांना टेंडर पास करुन देण्याचे अमिष दखवुन,फिर्यादी यांचेकडुन ऑनलाईन ३२,८००/- रु घेऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (फिर्यादी यांना फसवणुक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) शिंदे ९८२११ १८६५४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३०९/१७,भादविक ४०६ |
| **फिर्यादी** | राजेंद्रप्रसाद खंडेलवाल,वय-३३,रा.गुरूवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | निजाम शेख (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०७/१७ रोजी १७/०० वा. ५०१ गंज पेठ,व्यंकटेश हाईट्स पहिला मजाल,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे सोने कारागिरीचे दुकान आहे. यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे मित्राची ओळख सांगुन त्यांचे दुकानात कारागीर म्हणुन कामासाठी येवुन त्यांचा विश्वास संपादन करून,फिर्यादी यांनी विश्वासाने कामासाठी सॅम्पल म्हणुन १ लाख ५ हजार रू किचा सोन्याचा हार दिला असताना,सदर इसमाने स्वतःचे फायदयाकरीता सदरचा हार घेवुन जावुन त्याचा अपहार केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्हि एस पवार ९४०५५८७००२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३०८/१७,भादविक ४२०,५०७,३४ |
| **फिर्यादी** | बाबासाहेब काशीद,वय-३०,रा.दत्तवाडी,पुणे |
| **आरोपी** | तुषार प्रभाकर आहीरे,वय-२४,रा.लिमये नगर,धायरी,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे सप्टेंबर २०१६ ते एप्रिल २०१७ रोजीचे कालावधीत मुद्रा टुर्स,शिवाजी रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम तुषार अहिरे व इतर साथीदारांनी फिर्यादी यांना दुबई टुरचे अमिष दाखवुन, फिर्यादी यांचेकडुन एकुण १ लाख रुपये घेऊन त्यांना टुरला न पाठविता त्यांचे पैसे देखील परत न करता फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्हि.डी.केसरकर ९९२३४७ ०५९९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३०७/१७,भादविक ३८७,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४८,रा.मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | १.अनिल वाघु शिलारे,वय-४६,रा.५७१,शुकवार पेठ,पुणे २.सागर वाघु खिलारे,वय-४२,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०७/१७ रोजी १४/१५ वा. शुकवार पेठ,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दुकानावर असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादीचे दुकानात येवुन त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून,फिर्यादी यांना तुझ्या भावासाठी आम्ही खुन केला आहे,ती केस आता स्टॅण्ड होणार आहे,त्यासाठी आम्हाला पैसे लागणार आहेत,तु आम्हाला १० लाख रूपये दे व तुझे दुकान चालु ठेवायचे असेल तर दर महिन्याला आम्हाला खर्चा साठी १० हजार रूपये दे, नाहीतर आम्ही तुला खलास करू अशी धमकी देवुन जाताना तु पोलीसांकडे तक्रार केली तर जेलमध्ये राहुन तुझी गेम वाजवीन अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संजय गायकवाड ९८२३९३८५५१ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २२५/१७,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३६३,३२५,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | शुभम कुलकर्णी,वय-२२,रा.सदाशिव पेठ,पुणें |
| **आरोपी** | १.आदर्श मधुकर ननावरे,वय-२१,रा.विवेकश्री अर्पा.राजेंद्रनगर,पुणे २.सुरज ऊर्फ स्वप्नील रमेश सोनवणे,वय-२३,रा.१००५,राजेंद्रनगर,पुणे ३.शुभम अशोक बुरुंगळे,वय-१९,रा.स.नं.१३४, दांडेकर पुल,पुणे ४.आदर्श मधुकर ननावरे,वय-२१,रा.विवेकश्री अर्पा. राजेंद्रनगर,पुणे ५.शंकर हिंदुराव पाटील,वय-२५,रा.१००५,राजेंद्रनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०७/१७ रोजी २१/१५ ते २२/०० वा.चे दरम्यान विजयानगर कॉलनी,साईबाबा मंदिरा जवळ,ए-वन कच्ची दाबेली हातगाडी समोर सार्वजनिक रोडवर ते राजेंद्रनगर दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी कच्ची दाबेली खात असताना,त्यांच्या तोंडओळखीचे यातील नमुद इसमांनी अचानकपणे येवुन त्यांच्यापैकी आदर्श ननावरे यांने मला ओळखले का अशी विचारणा करून,लोखंडी छत्रीच्या दांडक्याने फिर्यादी यांचे हाता-पायावर मारहाण करून जबरदस्तीने त्यांच्या मोटार सायकलवर मध्ये बसवुन राजेंद्रनगर मध्ये नेवुन,परत सदर इसमांनी शिवीगाळ व हाताने मारहाण करून त्यांचेकडील लोखंडी रॉडने फिर्यादी यांचे दोन्ही पायावर दोन्ही हातावर व डोक्याला डाव्या बाजुस मारून जखमी करून,जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरीक्षक, शेऴके ९८२३४४१२१३ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २१४/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | विजया घोणे,वय-४५,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०४/१७ रोजी ०१/०० ते ०१/३० वा. चे दरम्यान चिंतामणी नगर,बिबवेवाडी,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे बँकेतील खात्यातील २९,०६८/- रुपये ऑनलाईन ट्रान्झेक्शन करुन ती रक्कम स्वतःचे फायदयाकरीता काढुन घेऊन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) बर्गे ७७४४८१२५३५ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३९४/१७,भादविक ३८०,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | वैभव भार्गव,वय-३६ वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपी** | विवेक राजोले,रा.आदर्श कॉलनी रोड,आदर्श कॉलनी फेज-१,बिदर,राज्य कर्नाटक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०५/२०१७ रोजी ते दि.२१/०६/२०१७ रोजीचे दरम्यान पोडीयम सिस्टीम प्रा.लिमी. १०३,वैदेही साकेत,बाणेर पाषाण लिंक रोड,पुणेचे ऑफीस मध्ये ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची पोडीयम सिस्टीम प्रा.लिमी. नावाची सॉफ्टवेअर कंपनी आहे. सदर कंपनीकडुन ग्राहकांना सिनेमा संबधीचे ट्रेलर दाखविणेसाठी 'रिव्हुव्ह देदे' या नावाचे ॲप्लीकेशन तयार केले होते. सदरचा ॲप हा जास्तीत जास्त लोकांनी डाऊनलोड करून वापर करण्यासाठी फिर्यादी यांनी ग्राहकांसाठी ऑफर व बक्षीसे ठेवली होती. सदरचे ॲप यातील नमुद इसमाने डाऊनलोड करुन,फिर्यादी यांच्या परवानगी शिवाय स्वतःचे आर्थिक फायदयाकरिता 'रिव्हुव्ह देदे' या ॲप्लीकेशनची बॅकअप सिस्टीम हॅक करून,त्यामधील पीव्हीआर सिनेमाचे ६७, कार्निव्हल सिनेमाचे २६ व शॅापर स्टॉपचे १३० व्हाऊचर असे एकुण २२३ व्हाऊचर्स चोरी करून,त्यापैकी पीव्हीआरचे एकुण ३० व्हाऊचर्स ९,०००/- रूचे व शॉपर्स स्टॉपचे ५ व्हाऊचर्स १५००/- रूचे असे सर्व मिळुन एकुण १०,५००/- रूपयांची फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली. तसेच वेग-वेगळया क्रमांकाना वेग-वेगळया तपशिलाचे व्यक्तीगत, बदनामीकारक व सिस्टीम कशी हॅक करावयाची अशा स्वरूपाचे एसएमएस पाठविले आहे. (फिर्यादी यांनी प्रथम सायबर क्राईम सेल पुणे येथे तक्रारी अर्ज केला होता.) |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे) वैशाली गलांडे |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३९५/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | रवि राव,वय-५२ वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०७/२०१७ रोजी १३/५७ वा. ते १४/०९ वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी असताना त्यांचे बाणेर रोड शाखा,पुणे येथील बॅंकेतील चालु खात्यामधून ८,८७३/- रुपये तसेच १४/०९ वा. २९,८४०/- रुपये असे एकुण ३८,७१४/- रुपयांचे कोणीतरी अज्ञात इसमाने ऑनलाईन ट्रान्झेक्शन करून पैसे काढुन घेऊन फिर्यादी यांचे फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. दयानंद ढोमे ९८२२२३५४६६ |

## दि.१९/०७/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २२६/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | विलास पानसे,वय-६५,रा.सहकारनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०७/१७ रोजी सकाळी ११/०० ते १८/०० वा. चे दरम्यान दुर्वांकुर बंगला,प्लॉट क्र.२९२, सहकारनगर नं.२,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे तळमजल्यातील रूमचे खिडकीची ग्रील तोडुन,पहिल्या मजल्यावरील असलेल्या दोन बेडरूमचे दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूमचे कपाटातील रोख १६ हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण ६ लाख १८ हजार रू किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एस. अभंग ८१०८११०६५१ |

## दि.१८/०७/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड रोड | भादविक ४२०,४०६ | राजेंद्र लक्ष्मण सुर्यवंशी | ५५ |
| २ | हडपसर | भादविक २७९,३०४(अ) | प्रतुल ओमप्रकाश गौतम | २६ |
| ३ | हडपसर | भादविक ३९२,३४ | राज विरेहसिंग ठाकुर | २३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | सहकारनगर | भादविक ३७९,४२७ | जमील महमद कुरेशी | ५५ |
| ५ | भा.विद्यापीठ | भादविक ३९२,३४ | ओंकार सुनिल सावंत | १९ |
| ६ | भा.विद्यापीठ | भादविक ३९२,३४ | प्रतिक राजु साळवी | १९ |
| ७ | पिंपरी | भादविक ३९२,३२३,५०६(२) | सुरेद विठ्ठल रेणुसे | २३ |
| ८ | कोरेगांव | भादविक ३६३,३६७ | पंडीत सिध्दु चव्हाण | २० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**